आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
२७ सप्टेंबर २०२५ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- ओदिशामधल्या झारसुगुडा इथं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते साठ हजार कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या विविध विकासप्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी

- 4G मोबाईल सेवेसाठी महाराष्ट्रात ९ हजार २० टॉवर उभारण्यात येणार

- वन्यप्राण्यांची शांतता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला चालना मिळेल असं केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचं प्रतिपादन

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या ‘मन की बात’ कार्यक्रमातून देशवासियांना संबोधित करणार

**आणि**

- बाराव्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धांना आजपासून नवी दिल्लीत प्रारंभ

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ओदिशात झारसुगुडा इथं आयोजित कार्यक्रमात साठ हजार कोटी रुपयांहून अधिक किमतीच्या विविध विकास प्रकल्पांचं उद्घाटन आणि पायाभरणी केली. दूरसंचार, रेल्वे, उच्च शिक्षण, आरोग्यसेवा, कौशल्य विकास, ग्रामीण गृहनिर्माण क्षेत्र अशा विविध क्षेत्रांतल्या प्रकल्पांचा त्यात समावेश आहे. गरीबांना हक्काचं पक्कं घर मिळवून देण्यासाठी केंद्रसरकार वचनबद्ध असल्याचं त्यांनी यावेळी भाषणात सांगितलं.

दूरसंचार क्षेत्रात, स्वदेशी तंत्रज्ञानाच्या आणि सुमारे ३७ हजार कोटी रुपये खर्चाच्या ९७ हजार ५०० पेक्षा जास्त मोबाईल 4G टॉवर्सचं उद्घाटन त्यांनी केलं. या क्षेत्रातल्या भारताच्या प्रगतीबद्दल ते म्हणाले....

**- - होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - -**

या टॉवर्समुळे ३० हजार गावांमधे उच्च वेगाने इंटरनेट सुविधा लौकरच उपलब्ध होईल, असं प्रधानमंत्री म्हणाले. या प्रकल्पांमुळे ओदिशा आणि शेजारी राज्यांमध्ये

मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीत मोठ्या प्रमाणावर सुधारणा होऊन स्थानिक उद्योग आणि व्यापाराला बळकटी मिळेल.

या कार्यक्रमाचं थेट प्रक्षेपण पुण्यात करण्यात आलं, यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. 4Gच्या माध्यमातून गावागावांपर्यंत संपर्क व्यवस्था उभी राहत आहे, याद्वारे नागरिकांसाठी आवश्यक सेवा येत्या दोन महिन्यात सुरू करणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. देशभरात ९२ हजारपेक्षा जास्त टॉवर उभारण्यात येणार असून त्यातले ९ हजार २० टॉवर महाराष्ट्रात आहेत, असं मुख्यमंत्र्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ओदिशा ते गुजरात या अमृत भारत एक्स्प्रेसला हिरवा झेंडा दाखवला. ही गुजरातला जाणारी पहिली अमृत भारत एक्स्प्रेस आहे. यावेळी रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव आणि केंद्रीय जलशक्ती मंत्री सी आर पाटील उधना रेल्वेस्थानकावर उपस्थित होते. ही गाडी ओदिशातल्या बेहरामपूरपासून आंध्रप्रदेश, छत्तीसगड, महाराष्ट्र या राज्यांमधून प्रवास करत ते गुजरातमधे सुरत पर्यंत धावणार आहे. जगातल्या सर्वात मोठ्या रेल्वेस्थानकाचं नूतनीकरण करण्याची योजना सरकार आखत असून पुढल्या ५० वर्षांचा विचार करून हे नूतनीकरण केलं जात असल्याचं रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

सेवा आणि सुशासन या मार्गदर्शक तत्वांनुसार वाटचाल करत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकार सतत कार्यरत आहे. सेवा पर्व या मालिकेत आज आपण स्मरण करणार आहोत देशाच्या अजरामर वारसा आणि आदर्शांचं....

**- -होल्ड- व्हॉईस कास्ट - -**

*(थोर स्वातंत्र्य सेनानी, तत्वचिंतक आणि परंपरेच्या रक्षकांनी केलेल्या बलिदान आणि योगदानातून राष्ट्राची उभारणी होते. अशा थोर व्यक्तिमत्वांच्या सन्मानासाठी केंद्र सरकारने अनेक पावलं उचलली. त्यांच्या इतिहासाशी संबंधित अनेक वास्तूंचा जीर्णोद्धार झाला. तर अनेक नवीन वास्तू बांधण्यात आल्या. नवीन संसद भवनाच्या उद्घाटन प्रसंगी प्रधानमंत्र्यांनी या प्रतीकांचं महत्त्व समजावून सांगितलं….*

***- - -होल्ड- बाईट- प्रधानमंत्री - -***

*दिल्लीतलं युद्ध स्मारक, अमृतसरच्या जालियनवाला बागेतलं स्मारक, तीनमूर्ती भवनात सुरु केलेलं प्रधानमंत्री संग्रहालय यांचा त्यात समावेश आहे. राष्ट्रीय पोलीस स्मारक, आदिवासी स्वातंत्र्यलढ्यातल्या सेनानींचं संग्रहालय या वास्तू त्यात्या क्षेत्रातला इतिहास सांगतात.)*

**<><><><>**

वस्तू आणि सेवा कररचनेतले बदल गेल्या सोमवारपासून लागू झाले आहेत, हा बचत उत्सव असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी देशाला संबोधित करताना सांगितलं. या करसुधारणांमुळे सर्वसामान्य नागरिकांवरचा अप्रत्यक्ष करांचा बोजा कमी होणार आहे.ऐकूया आरोग्य क्षेत्रात या बदलांच्या परिणामाबद्दल....

**- - -व्हॉईस कास्ट- - -**

*(जीएसटीतल्या बदलांमुळे आरोग्यासाठी आवश्यक अनेक वस्तू आणि सेवांवरचे कर कमी झाले आहेत. व्यायामशाळा आणि फिटनेस सेंटर्सवरचा कर आता १८ टक्क्यांवरुन ५ टक्के झाला आहे. त्यामुळे तंदुरुस्त राहण्यासाठी प्रयत्न करणं सर्वसामान्यांच्या आवाक्यात आलं आहे. या खेरीज दूध आणि दुधाचे पदार्थ, सुकामेवा आणि उतर पौष्टिक खाद्यपदार्थांवरचा कर शून्य किंवा ५ टक्के झाला आहे. आरोग्याच्या देखभालीसाठी स्वदेशी उत्पादनंच वापरावी असं आवाहन प्रधानमंत्र्यांनी नुकतच केलं होतं.)*

**<><><><>**

वन्यप्राण्यांची शांतता भंग न करता जंगलांचा अधिक भाग पर्यटकांसाठी खुला केला तर स्थानिक आदिवासींच्या विकासाला चालना मिळेल, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी व्यक्त केलं आहे. नवी दिल्ली इथं आयोजित वन्यजीवनाबद्दलच्या छायाचित्र प्रदर्शनाचं उदघाटन करताना ते आज बोलत होते. सध्या देशातल्या जंगलांमधला फक्त २० टक्के भागच पर्यटकांसाठी खुला असून ८० टक्के भागात पर्यटकांना प्रवेश नसल्याची माहिती त्यांनी यावेळी दिली. राजस्थान आणि महाराष्ट्रातल्या पर्यटनस्थळांचा विकास झाल्यामुळे स्थानिक आदिवासी तरुणांना रोजगार मिळाल्याचं त्यांनी नमूद केलं. नागपूर ते जबलपूर महामार्गावर वाघांच्या संरक्षणासाठी विशेष मार्गिका तयार केल्या असून त्यामुळे रस्त्यावरच्या वाहतुकीसोबतच वन्यप्राण्यांच्या हालचालींनाही कोणताही अडथळा येत नाही असं त्यांनी सांगितलं.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून देशोदेशीच्या श्रोत्यांना संबोधित करतील. हा या कार्यक्रमाचा १२६ वा भाग असेल.

<><><><>

आज जागतिक पर्यटन दिन आहे. सांस्कृतिक देवाणघेवाण आणि आर्थिक विकासात पर्यटनाचं महत्त्व समजावं म्हणून हा दिवस साजरा केला जातो. "पर्यटन आणि शाश्वत बदल" ही यंदाची संकल्पना आहे. संयुक्त राष्ट्रांच्या जागतिक पर्यटन संघटनेच्या कायद्यांनुसार पहिल्यांदा १९८० मध्ये पर्यटन दिवस साजरा करण्यात आला. जून २०२५ पर्यंत, भारतात येणाऱ्या पर्यटकांची संख्या १ कोटी ६४ लाख होती, तर परदेशात जाणाऱ्या पर्यटकांची संख्या ८ कोटी ४४ लाख नोंदवली गेली.

<><><><>

सी बी आय अर्थात केंद्रीय अन्वेषण विभागानं नवी मुंबईच्या स्फोटकं, पेट्रोलियम आणि स्फोटकं सुरक्षा संघटनेच्या प्रमुखासह नियंत्रकाला आणि एका व्यक्तीला आज लाचखोरी प्रकरणात अटक केली. खासगी सल्लागार आणि एजंट्सच्या मदतीनं मोठ्या प्रमाणावर लाचखोरी केल्याच्या आरोपाखाली सापळा रचून त्याला अटक करण्यात आली.

<><><><>

माहिती आणि प्रसारण मंत्रालयाच्या अंतर्गत असलेल्या राष्ट्रीय चित्रपट विभाग महामंडळाची सहनिर्मिती असणारा, इंडो-स्वीस संयुक्त निर्मिती 'तारा अँड आकाश' हा चित्रपट काल प्रदर्शित झाला. हा चित्रपट टोरांटो आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, भारतीय आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव या महोत्सवात दाखवला गेला आहे. मुंबईत या चित्रपटाचे बावीस शो आयोजित केले आहेत.

<><><><>

युक्रेननं रशियाच्या ऊर्जाक्षेत्राशी संबंधित पायाभूत सुविधांवर केलेल्या ड्रोन हल्ल्यांमुळं निर्यातीला फटका बसून तेलाच्या किंमती वाढल्या आहेत. ब्रेंट क्रूड निर्देशांक ७१ सेंट्सने वाढून ७० डॉलर्स आणि १३ सेंट्स प्रति बॅरलवर स्थिरावला, तर डब्ल्यूटीआय क्रूड निर्देशांक ७४ सेंट्सनी वाढून ६५ डॉलर्स आणि ७२ सेंट्सवर बंद झाला.

<><><><>

बाराव्या जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५ ला आज नवी दिल्लीतल्या जवाहरलाल नेहरु मैदानावर प्रारंभ झाला.  या स्पर्धेत शंभराहून अधिक देशांमधले हजाराहून जास्त खेळाडू भाग घेत आहेत. उद्घाटनाच्या आजच्या सोहळ्यात पॅरिस पॅराऑलिंपिकमध्ये क्लब थ्रो प्रकारात सुवर्णपदक जिंकणारा धरमबीर नैन आणि दुहेरी कांस्य पदक विजेती धावपटू प्रीती पाल यांनी भारतीय पथकाचं नेतृत्व केलं.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी जागतिक पॅरा ॲथलेटिक्स स्पर्धा २०२५ चं यजमानपद नवी दिल्लीनं भूषवणं ही देशासाठी अभिमानाची बाब असल्याचं म्हटलं आहे. या महत्वाच्या आंतरराष्ट्रीय स्पर्धेसाठी जगभरातले पॅरा ॲथलिट्स भारतात एकत्र आले आहेत, असं त्यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून दृढनिश्चय आणि चैतन्य अनुभवायला मिळतं असं प्रधानमंत्री म्हणाले.

**<><><><><>**

दिल्लीत सुरु असलेल्या ISSF कनिष्ठ नेमबाजी विश्वचषक स्पर्धेत आज भारताच्या रश्मिका सहगल आणि कपिल या जोडीने १० मीटर मिश्र एअर पिस्टल प्रकारात सुवर्णपदक पटकावलं.

**<><><><><>**

हवामान खात्याने राज्यात काही जिल्ह्यामध्ये अतिवृष्टीचा अंदाज व्यक्त केल्यामुळे राष्ट्रीय आपत्ती प्रतिसाद दलाने महाराष्ट्रात सोलापूर आणि धाराशिव जिल्ह्यात प्रत्येकी २ पथकं, तसंच  बीड आणि लातूर जिल्ह्यात प्रत्येकी १ पथक तातडीच्या मदतकार्यासाठी तैनात केलं आहे.

**//<><><><><>//**